# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

**दिनांक ११.१०.२०२६ रविवार**

**१) नागपूर शहर पोलीस आयुक्तालय, परिमंडळ क्रमांक ०२ अंतर्गत 'पोलीस–वैद्यकीय समन्वय निर्देशिका' कार्यरत :–**

नागपूर शहर परिमंडळ क्र. ०२ अंतर्गत ०६ पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या एकुण ८६ रुग्णालयाचा समावेश असलेली 'पोलीस–वैद्यकीय समन्वय निर्देशिका' तयार करण्यात आलेली आहे. ज्यामध्ये प्रत्येक रुग्णालयाची माहिती पोलीस ठाणे अंतर्गत येणाऱ्या बिट अधिकारी यांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यात प्रामुख्याने रुग्णालयाचे नाव व पत्ता संबंधित डॉक्टर व रुग्णालयाचे प्रशासकीय अधिकारी यांचे संपर्क तपशील व पोलीस उपायुक्त, सहाय्यक पोलीस आयुक्त, वरिष्ठ पोलीस निरिक्षक व संबंधित बिट अधिकारी, यांची नावे व संपर्क क्रमांक उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. सर्वांचा व्हॉट्स ॲप ग्रुप तयार करण्यात आला असून यापूढेही त्यामध्ये रुग्णालयाचे प्रशासकीय अधिकारी यांना समाविष्ठ करण्यात येणार आहे.

निर्देशिकेत रुग्णालयाचे जवळील क्युआर कोड पॉईंट बाबत माहिती दिलेली आहे. बिट मार्शल यांची नियीमत भेट तेथे राहणार आहे. पोलीसांचा रुग्णालयांशी व तेथील डॉक्टर व अधिकारी यांच्याशी नियमित संपर्क व संवाद होवून समन्वय राखन्यास याद्वारे मदत होणार आहे. प्रत्येक रुग्णालयाला मदतीसाठी कोणत्या पोलीस अधिकाऱ्याशी संपर्क साधायचा व संबंधित अधिकारी यांची माहिती असावी हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. गंभीर वैद्यकीय परिस्थितीत कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास संभाव्य अनुचित घटना टाळणे शक्य होवून डॉक्टरांना रुग्णाचे उपचारावर लक्ष केंद्रीत करता येईल. पोलीस विभाग व वैद्यकीय क्षेत्र यांचेमध्ये प्रभावी संवाद, चांगला समन्वय व परस्पर सहकार्य या द्वारे साध्य करता येईल.

मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, यांचे संकल्पनेतून मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त, मा. श्रीमती विनीता शाहु अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) यांचे मार्गदर्शनाखाली मा. श्रीमती अण्णपुर्णा सिंह, पोलीस उप आयुक्त (परि क्र ०२) यांनी वरील 'पोलीस–वैद्यकीय समन्वय निर्देशिका' तयार केलेली आहे व रुग्णालयाला भेटी देवून तेथील वैद्यकीय अधिकारी यांचेसोबत संवाद साधून समन्वय साधला आहे.



(कामगिरी)

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १०.१०.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ०२ केसेसमध्ये ०२ ईसमावर कारवाई करून एकुण ४,२९०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला. जुगार कायद्यान्वये ०३ केसमध्ये १३ ईसमावर कारवाई करून एकुण १२,६३,३००/—रू. चा मुद्देमाल जप्त केला.

**वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ओव्हरस्पीड वाहन चालविणे कलम १८४ मोवाका अन्वये ५२ केस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये १२७ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये ११६ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये १५३ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये १०२ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये ६६ केसेस, ड्रायव्हींग विदाऊट युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये ०६ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये १८१ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ०३ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये १५ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये ५८ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये ८५४ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे १४ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये ४० केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण १,८९२ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ८,४६,९००/—रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.**

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा सामाजीक सुरक्षा विभाग पोलीसांची कामगिरी :— देहव्यवसाय करवुन घेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १०.१०.२०२६ चे १५.२५ वा. ते १८.१० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा सामाजीक सुरक्षा विभाग पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, त्यांनी पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत, प्लॉट नं. ७०, आर्शिवाद नगर, संगम रोड, नागपूर येथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे राहणारी आरोपी महिला नामे ललीता उर्फ पुजा संजय यादव वय ३७ वर्षे, ही पीडीत महिला हिला देहव्यवसायाकरीता प्रवृत्त करून, तिचेकडुन देहव्यापार करवुन घेतांना समक्ष मिळून आली. आरोपी ही स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता ग्राहकांना व पिडीत महीलेस देहव्यापाराकरीता जागा उपलब्ध करवून देहव्यवसाय करवुन घेताना समक्ष मिळुन आली. आरोपीचे ताब्यातुन ०१ पिडीत महीलेची सुटका करण्यात आली. पिडीत महिला ही मध्य प्रदेश राज्यातील असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीचे ताब्यातुन रोख १,५००/—रू., ०१ मोबाईल फोन, व इतर साहित्य असा एकुण किंमती अंदाजे ११,५३०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी विरूध्द पोलीस ठाणे एमआयडीसी येथे कलम १४३(२) भा.न्या.सं., सहकलम ३,४,५,७ अनैतिक देहव्यापार प्रतिबंधक अधिनीयम अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपी व पिडीत महिलेस मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव एमआयडीसी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले.

वरील कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. राजेंद्र दाभाडे, मा. पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन) श्री. दीपक अग्रवाल, मा. सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) श्री. वैभव जाधव यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. दर्शन पाटील व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



(गुन्हे)

१) पोलीस ठाणे गिट्टीखदान :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक ०९.१०.२०२६ चे १३.०० चे सुमारास, फिर्यादी शिवकुमार कचरूजी वानखेडे, वय ४५ वर्षे रा. टि.व्हि. टावरजवळ, मानवता नगर हे त्यांचा मित्र प्रविण पंजाबरावजी कुहीके वय ३७ वर्षे, रा. मानवता नगर, मैत्री संघ बुध्द विहाराजवळ याचेसह त्याचे दुचाकी क्र. एम.एच. ४० बीएम ५५१७ ने जात असतांना, पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत, काटोल रोड, निर्मल गंगा कॉम्प्लेक्स समोर त्यांचे मागुन येणाऱ्या एका निळ्या रंगाचे बजाज मॅझीमा गाडी क्र. एमएच ४९ बीएन २३०४ चे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे मित्राचे दुचाकीला कट मारल्याने, फिर्यादी व मित्र हे खाली पडुन फिर्यादी किरकोळ व मित्र हे गंभीर जखमी झाले. गंभीर जखमी फिर्यादीचे मित्राला उपचाराकरीता खाजगी व तेथून मेयो व मेडीकल हॉस्पीटल येथे दाखल करण्यात आले होते. उपचारा दरम्यान दिनांक १०.१०.२०२६ चे ११.४५ वा. डॉक्टरांनी फिर्यादीचे मित्र प्रविण कुहिके यांना तपासुन मृत घोषीत केले. फियांदीचा उपचार करण्यात आला आहे.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे आरोपीविरूध्द कलम १०६(१),२८१ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे सिताबर्डी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

फिर्यादी सुनिल हरिशचंद्र घुरेडे, वय ५३ वर्षे रा. महाजन ले—आऊट, आखरी बस स्टॉप, जयताळा हे पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत वर्धा रोड, रामदास पेठ, लोकमत बिल्डींगजवळील डॉक्टर गिरी यांचे दवाखान्याचे निर्माणाधीन ईमारतीचे साईडवर सेक्युरीटी इंचार्ज म्हणून काम पाहतात. दिनांक १०.१०.२०२६ चे ०६.०० वा. ते दिनांक १२.०० वा. चे दरम्यान, एका अनोळखी आरोपी ईसमाने येवून तेथील गार्डला लेबर कामावर येत आहेत असे सांगून तिसरे माळ्यावरील स्टोअर रूमचे दाराचे कुलुप तोडून त्यातील कॉपर पाईल बंडल ३० किलो वजनी ०६ नग, तसेच कॉपर रॉड व एल बी असा एकुण किंमती ३७,८१,५००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सिताबर्डी येथे पोउपनि. भवाळ ८२०८७७४३४७ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५,३३१(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे राणाप्रतापनगर :— हद्दपार ईसमास अटक.

दिनांक १०.१०.२०२६ चे २१.४० वा. चे सुमारास, राणाप्रतापनगर पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, सुभाषनगर मेट्रो स्टेशनजवळ एक हद्दपार ईसम ईसम फिरत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा ईसम दिसुन आला. तो पोलीसांना पाहुन पळुन जात असता, त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले व पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव अंकुश उर्फ डिज्जु उर्फ राजकुमार किशोर जमरे, वय ३० वर्षे, रा. गल्ली नं. ०९, संत तुकडोजी नगर, कामगार नगर, नागपूर असे सांगीतले. आरोपीचा अभिलेख

तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ३९६६/२०२५ दिनांक २०.०९.२०२५ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे राणाप्रतापनगर येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे तहसील** :— दिनांक १०.१०.२०२६ चे १७.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे तहसील हद्दीत, रामझुलाजवळील डिव्हायडर, मेट्रो पिल्लर क्र. ०३ जवळ सी.ए. रोड येथे एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ६० वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे तहसील येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी फिर्यादी मुबारक अली खान उमर खान, वय ३४ वर्षे, रा. मोमीनपूरा, यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे तहसील येथे पोउपनि. संजय माने यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**